
ध्येय प्रतिज्ञा
अभ्यासात, परीक्षेत आणि जिवनांत यशस्वी होणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार असून तो मी मिळवणारच!
’जगातील कोणतीही समस्या, संकटे किंवा शक्ति मला माझे ध्येय साध्य करण्यापासून परावृत्त करु शकणार नाहीत. त्यासाठी नियोजनबद्ध कृति व आवश्यक ते सर्व प्रयत्न मात्र मी करीन.

माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!

तुम्ही या आधीही अभ्यास करून पास होण्यासाठी प्रयत्न केले असतील. परंतु तुम्ही ठाम असा निश्चय-विचार मात्र केला नसेल. कारण तसे केले असते तर त्यानुसार तुम्ही आखणी करून जीव तोडून अभ्यास केला असता आणि तुमचे राहिलेले विषय पास झाला असता. मित्रांनो, अजूनही वेळ गेलेली नाही, आज नव्हे आताच एका कागदावर छानपैकी तुमचं नाव, ध्येयप्रतिज्ञा, कोणत्या विषयात किती मार्क मिळवायचेत ते ध्येय मोठ्या अक्षरांमध्ये लिहा व तुम्हाला नेहमी दिसेल अशा ठिकाणी लावा. एवढे केले तर त्याचे अतिशय सकारात्मक व आनंददायी परीणाम तुम्हाला आजपासून ते परीक्षां दरम्यान व निकालाच्या दिवशी बघायला मिळतील.

मित्रांनो, **"आपले विचार आपली कृती ठरवतात आणि आपली कृतीच आपलं भविष्य ठरवते"**

हे अगदी खरं आहे! आपली ध्येयप्रतिज्ञा अशाचप्रकारे आपल्याला चांगले विचार देण्याचं काम करते. एकदा किंवा दोनदा नापास झाल्यावर आपला धीर सुटतो आणि आपण नकारात्मक विचार करायला लागतो. उदाहरण द्यायचे झाले तर आपण स्वतःची अशी समजूत करून घेतो की आपण इतरांपेक्षा कमी हुशार आहोत, आपली स्मरणशक्ती तेवढी चांगली नाही. एकदा का अशा विचारांनी आपल्या मनावर ताबा घेतला की आपलं अभ्यासावर लक्ष लागत नाही, मनासारखा अभ्यास होत नाही आणि मग आधीचा नकारात्मक विचार अजून जास्त पॉवरफूल होतो. असं हे अतिशय दुष्ट चक्र सुरू होतं आणि या भोवऱ्यात आपण अडकतो.

त्याऐवजी आपण असा विचार केला की आपल्यातही निसर्गाने सारखीच विचारशक्ती दिली आहे फक्त तीचा वापर कसा करावा हे आपल्याला कळत नाहीए किंवा आपण तिचा वापरच करीत नाहीए. या विचारातूनच नविन कृतीचा जन्म होतो, आपण आपली अभ्यासाची पद्धत शोधायला लागतो. त्यात आपल्याला हळु-हळु यश यायला लागतं आणि त्याचा परीणाम आपल्याला अभ्यासामध्ये दिसायला लागतो. अशाप्रकारे आपण चांगला अभ्यासात करण्यात यशस्वी झालो तर त्याचे परीणाम स्वरूप आपण परीक्षेमध्ये चांगली कामगिरी करतो आणि परीक्षेमध्ये चांगली कामगिरी केली तर आपण पास होऊन आपलं पुढील भविष्य उज्ज्वल होतं. गंमत म्हणजे हे सुद्धा एक चक्रच आहे नाही का? म्हणूनच मनामध्ये नेहमी होकारात्मक विचारांनाच येऊ द्या.

आता आपल्या ध्येयप्रतिज्ञेतील मधल्या भागाकडे जाऊ या. मित्रांनो, कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात, कष्ट घ्यावे लागतात आणि अभ्यास-परीक्षातरी त्याला अपवाद कशा असतील? कोणतंही काम करतांना सुरूवातीला ते कठिणच वाटतं. पण कामाला सुरूवात केली की आपल्याला मार्ग दिसू लागतात. आपण आपलं अभ्यासाचं-परीक्षेचं ध्येय ठरवल्यावर ते साध्य करण्याच्या प्रयत्नाला आपण लागतो. आपण नापास झालेले विषय आपल्याला कठिण वाटत असतील तर आपण ते समजून घेण्यासाठी वेगवेगळया मार्गांचा अवलंब करतो. आता सुद्धा तुम्हाला या संदर्भातील अडचणी असतील तर न लाजता व जरासुद्धा वेळ न दवडता तुमच्या मित्राची किंवा शिक्षकांची मदत घ्या. तुमची तळमळ बघून तुम्हाला कोणीही मदत करायला तयार होईल. इतर काही अडचणी असतील तर त्यासाठीही तुम्ही मदत मागा. आपल्या प्रत्येक पत्राच्या शेवटी हेल्प-लाईन नंबर दिलाय हवं तर त्यावर कॉल करा व आपली अडचण सोडवून घ्या. मित्रांनो, तुम्ही कदाचित सुदैवी आहात की तुमच्या वाटेला अतिशय गंभीर अडचणी किंवा संकटं आली नाहीत. कारण अशीही काही उदाहरणं बघायला, ऐकायला व वाचायला मिळतात की ऐन १०वी-१२वी परीक्षेच्या दरम्यान काही विद्यार्थ्यांवर अक्षरशः संकटांचे डोंगरच कोसळलेत... कोणाचं जन्मदात्यांचं छप्परच हरवतं तर कोणी अपघातात सापडतात तर कोणाला गंभीर आजारांशी झुंज द्यायची वेळ येते. काय हालत होत असेल त्यांची नाही का? परंतु त्यातलीच अशी अनेक उदाहरणं माझ्या बघण्यात आहेत की अशाही परीस्थितीत त्यांनी हार न मानता जिद्द व चिकाटीने परीक्षा दिल्यात आणि त्यात दणदणीत यशही मिळवलंय! मग त्यांना शक्य असेल तर तुम्हाला तर सळज शक्य होईल. अडचण काहीही असो त्यावर मात करून मार्ग काढायची तयारी ठेवा. असं केलं तर निम्मी लढाई तुम्ही परीक्षेच्या आधीच जिंकलात म्हणून समजा!

आता शेवटी प्रतिज्ञेतील उर्वरीत भाग-नियोजनबद्ध कृती आणि आवश्यक ते प्रयत्न याविषयी पुढील पत्रांमधून सविस्तर मार्गदर्शन तुम्हाला मिळेल. तेव्हा प्रत्येक पत्र मन लावून वाचा व त्यानुसार कृती करीत जा.

थोडक्यात काय तर जीवनात यशस्वी होण्यासाठी, चांगली नोकरी, चांगलं शिक्षण घेणं गरजेचं आहे आणि त्यासाठी चांगला अभ्यास करणंही तितकंच आवश्यक आहे. हे करीत असताना अडचणी-संकटं आली तर त्यावर मात करून सातत्याने वाटचाल केली तर काहीच अशक्य नाही. परीक्षेच्या काळातील मनातल्या शंकांचं निरसन झालं तर त्याचा खूप चांगला फायदा होतो असा माझा अनुभव आहे. तेव्हा शंका असल्यास जरूर कॉल करा. बेस्ट ऑफ लक! खूप-खूप शुभेच्छा!

तुमचा लाडका,

भारूकाका

Help Line No. 086523 40256